**ठळक बातम्या**

- मुंबईत आयोजित WAVES परिषदेचा समारोप /Waves बाजार मध्ये १ हजार ३०० कोटी रुपयांपेक्षा अधिक रकमेची उलाढाल

- पाकिस्तानचे माजी प्रधानमंत्री इम्रान खान आणि पाकिस्तानी नेते बिलावल भुट्टो यांच्या एक्स अकाऊंटवर भारताची बंदी

- महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळानं घेतलेल्या, इयत्ता बारावीच्या परीक्षेचा उद्या निकाल

- महिला क्रिकेटमधे, तिरंगी एकदिवसीय मालिकेत आज कोलंबो इथं झालेल्या सामन्यात श्रीलंकेपुढं भारत पराभूत

**आणि**

- आयपीएल क्रिकेट स्पर्धेत कोलकाता इथं झालेल्या चुरशीच्या सामन्यात कोलकाता नाईट रायडर्सचा राजस्थान रॉयल्सवर निसटता विजय

**<><><><><>**

मुंबईत गेल्या ४ दिवसांपासून सुरू असलेल्या वेव्हज् परिषदेचा आज समारोप झाला. वेव्हज् बाजार मध्ये १ हजार ३०० कोटी रुपयांपेक्षा अधिक रकमेची उलाढाल झाली. WAVESX च्या माध्यमातून १५- १६ स्टार्टअपची गुंतवणूकदारांशी चर्चा सुरू आहे आणि यातून ५० कोटी रुपयांची गुंतवणूक अपेक्षित आहे. राज्य सरकारने या परिषदेत सुमारे ८ हजार कोटी रुपयांचे करार केले. त्यामुळे परिषदेच्या आयोजनाबद्दल माहिती प्रसारण खात्याचे सचिव संजय जाजू यांनी समाधान व्यक्त केले.

अखेरच्या दिवशी हजारो लोकांनी वेव्हज मध्ये सुरू असलेल्या प्रदर्शनांना भेट दिली आणि माध्यम तसंच मनोरंजन क्षेत्रातल्या घडामोडी जाणून घेतल्या. याशिवाय वेव्हजमध्ये झालेल्या विविध स्पर्धेतल्या अंतिम फेरीतल्या विजेत्यांचे सादरीकरण देखील आज झाले. वाह उस्ताद, सिंफनी ऑफ इंडिया, बॅटल ऑफ बँड्स आणि ईडीएम चॅलेंजच्या विजेत्यांच्या सादरीकरणाला प्रेक्षकांचा जोरदार प्रतिसाद मिळाला.

**<><><><><>**

पाकिस्तानचे माजी प्रधानमंत्री इम्रान खान आणि पाकिस्तानी नेते बिलावल भुट्टो यांच्या एक्स अकाऊंटवर आज भारतानं बंदी घातली. पहलगाममध्ये पर्यटकांवर झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने पाकिस्तानची चोहोबाजूंनी नाकाबंदी करायला सुरुवात केली आहे. त्या अंतर्गत ही कारवाई करण्यात आली आहे.

राजस्थानच्या श्रीगंगानगर इथं भारतीय हद्दीत आलेल्या पाकिस्तानी सैनिकाला भारतीय जवानांनी ताब्यात घेतलं. या पाकिस्तानी सैनिकाची सीमा सुरक्षा दलाकडून चौकशी सुरू आहे. यानंतर सीमा सुरक्षा दलानं श्रीगंगानगर भागात सुरक्षा व्यवस्था आणखी वाढवली आहे.

दरम्यान, आज पहाटे प्रत्यक्ष नियंत्रण रेषेवर पाकिस्तानी सैनिकांनी मोठ्या प्रमाणात गोळीबार केल्याचं वृत्त आहे. कुपवाडा, बारामुल्ला, राजोरी, पूंछ भागामध्ये पाकिस्तानी सैन्याकडून मोठ्या प्रमाणात गोळीबार करण्यात आला. भारतीय जवानांनीही या गोळीबाराला चोख प्रत्युत्तर दिलं आहे.

**<><><><><>**

देशातल्या जनतेच्या सर्व अपेक्षा, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली पूर्ण होतील असं संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी म्हटलं आहे. दिल्लीत संस्कृती जागरण महोत्सवाला संबोधित करताना ते बोलत होते. संपूर्ण जग भारताला

ओळखत असून आता जागतिक व्यासपीठावर भारताचं म्हणणं ऐकलं जातं, असं ते म्हणाले.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज नवी दिल्लीत त्यांच्या निवासस्थानी वायुसेनेचे प्रमुख एअर चीफ मार्शल ए. पी. सिंग यांची भेट घेतली. पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तानात वाढत असलेल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर ही भेट महत्वाची आहे.

<><><><><>

संरक्षण मंत्री राजनाथ सिंह उद्या दिल्लीत जपानचे संरक्षण मंत्री जेन नाकातानी यांच्यासोबत द्विपक्षीय बैठक घेणार आहेत. या बैठकीत दोन्ही बाजू सध्याच्या प्रादेशिक आणि आंतरराष्ट्रीय सुरक्षा परिस्थितीवर आणि द्विपक्षीय संरक्षण सहकार्य आणखी बळकट करण्याबाबत चर्चा करतील.

<><><><><>

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळानं घेतलेल्या, इयत्ता १२ वीच्या परीक्षेचा निकाल, उद्या दुपारी १ वाजता जाहीर होणार आहे. विद्यार्थ्यांना विषयनिहाय गुण, मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळांवर पाहता येतील.

<><><><><>

महिला क्रिकेटमधे, तिरंगी एकदिवसीय मालिकेत आज कोलंबो इथं झालेल्या सामन्यात श्रीलंकेनं भारतावर ३ गडी राखून विजय मिळवला. श्रीलंकेनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला. भारतानं निर्धारित ५० षटकात ९ गडी गमावून २७५ धावा केल्या. रिचा घोषनं सर्वाधिक ५८ धावा केल्या. श्रीलंकेतर्फे सुगंधिका कुमारी आणि चामरी अटापट्टू यांनी प्रत्येकी तीन बळी मिळवले.

श्रीलंकेनं ७ गड्यांच्या मोबदल्यात, सामन्यातले ५ चेंडू बाकी असताना विजयी लक्ष्य पार करत २७८ धावा केल्या. निलाक्षीका सिल्वानं ३३ चेंडूत ५६ धावा केल्या. तर हर्षिता समरविक्रमानं ५३ धावांचं योगदान दिलं. भारतातर्फे स्नेहा राणानं ३ बळी घेतले.

<><><><><>

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज कोलकाता इथं झालेल्या चुरशीच्या सामन्यात कोलकाता नाईट रायडर्सनं राजस्थान रॉयल्सवर एका धावेनं विजय मिळवला. कोलकाता नाईट रायडर्सनं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करायचा निर्णय घेतला, आणि निर्धारित २० षटकात ४ गडी गमावून २०६ धावा केल्या. आंद्रे रसेलनं २५ चेंडूत नाबाद ५७ धावा केल्या. त्याच्या या तडाखेबंद खेळीत चार चौकार आणि सहा षटकारांचा समावेश होता.

या धावसंख्येचा पाठलाग करताना राजस्थान रॉयल्सला २० षटकात ८ गडी गमावून २०५ धावाच करता आल्या. शेवटच्या चेंडूवर  जोफ्रा आर्चर धावबाद झाल्यानं त्यांना बरोबरीची संधी गमवावी लागली.

या स्पर्धेतला आजचा दुसरा सामना धर्मशाला इथं पंजाब किंग्ज आणि लखनऊ सुपर जायंट्स यांच्यात सुरु आहे. लखनऊ सुपर जायंट्सनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा पंजाब किंग्जच्या १४ व्या षटकात ३  बाद १३६धावा झाल्या होत्या.

<><><><><>

दुबई इथं झालेल्या ११व्या बुडोकन आंतरराष्ट्रीय कराटे स्पर्धेत भारताच्या अनर्घ्य अभिषेक पंचवतकर नं सुवर्णपदक जिंकल आहे. अनर्घ्यनं कुमिते प्रकारात उत्कृष्ट कामगिरी करत अव्वल स्थान मिळवले. तसंच त्यानं काटामध्ये ही

कांस्यपदक मिळवलं आहे. या स्पर्धेत १७ देशांच्या ९०० हून अधिक खेळाडूंनी भाग घेतला होता.

<><><><>

मुसळधार पावसानं आज आंध्रप्रदेशातल्या एन टी आर, कृष्णा, पूर्व गोदावरी, पश्चिम गोदावरी आणि कोणासीमा या तटवर्ती जिल्ह्यांना  झोडपून काढलं आहे. विजयवाडा, एलूरू आणि राजामुंड्री या जिल्ह्यांत सकाळपासून जोरदार पाऊस सुरू आहे. या अवकाळी पावसाचा परिणाम पश्चिम गोदावरी आणि कृष्णा जिल्ह्यांतल्या आंबा पिकांवर झाला  आहे. दरम्यान, एन टी आर आणि एलूरू जिल्ह्यातले जिल्हाधिकारी  स्थितीवर लक्ष ठेवून असून उन्मळून पडलेले वृक्ष बाजूला करण्याबरोबरच पूर आलेल्या भागात  मदत करत आहेत.

<><><><>

वॉशिंग्टन इथल्या जागतिक बँकेच्या मुख्यालयात ५ ते ८ मे दरम्यान होणाऱ्या ‘जागतिक बँक जमीन परिषद २०२५’ या परिषदेत भारत ‘जागतिक जमीन सुधारणा’ संवादा’चं नेतृत्व करणार आहे. पंचायती राज मंत्रालयाचे सचिव विवेक भारद्वाज यांच्या नेतृत्वाखालचं उच्चस्तरीय भारतीय शिष्टमंडळ या परिषदेत स्वामित्व योजना तसंच ग्राम मंचित्र मंचाविषयीची माहिती सादर करणार आहे. ‘हवामान कृतीसाठी जमिनीची मालकी आणि प्रवेश सुरक्षित करणे: जागरूकतेकडून कृतीकडे वाटचाल’ अशी या वर्षीच्या जागतिक बँकेच्या जमीन परिषदेची मुख्य संकल्पना  आहे.

<><><><>

भारतातलं सर्व प्राचीन ज्ञान संस्कृत भाषेत असल्यानं लोकांनी संस्कृत भाषा शिकायची आणि तिचा सराव करायची गरज असल्याचं प्रतिपादन केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी केलं आहे. संस्कृत भारती आयोजित '१००८ संस्कृत संभाषण शिबिरांच्या' समारोप कार्यक्रमाला संबोधित करताना शाह बोलत होते.

२३ एप्रिल ते ३ मे या कालावधीत संस्कृत भारतीनं नवी दिल्लीत संस्कृतची संभाषणांची १००८ शिबिरं आयोजित केली होती. या शिबिरांमध्ये २५ हजार जणांनी भाग घेतला.

<><><><><>

भारतीय कृषी संशोधन परिषदेनं विकसित केलेल्या, भारतातल्या पहिल्या दोन जीनोम संपादित भाताच्या वाणांचं कृषी मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी आज अनावरण केलं. भाताचे हे दोन्ही वाण उत्पादन खर्च कमी करतील आणि देशातलं भाताचं उत्पादन वाढवतील, असं त्यांनी सांगितलं. या प्रकल्पात सहभागी असलेल्या कृषी शास्त्रज्ञांचं देखील त्यांनी अभिनंदन केलं. भाताचे हे दोन्ही वाण केवळ शेतकऱ्यांसाठीच नव्हे तर जनतेसाठी देखील फायदेशीर ठरतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केलं.

<><><><><>

बलुचिस्तानमधल्या कलत जिल्ह्यातल्या मोंगोचार भागात बलोच लिबरेशन आर्मीनं मोठा हल्ला केला. यावेळी त्यांनी क्वेट्टा - कराची राष्ट्रीय महामार्ग २५ अडवला. लिबरेशन आर्मीनं अनेक इमारतींना आगी लावल्या. हा मुक्तीसाठीचा लढा असल्याचं बलोच आर्मीनं म्हटलं आहे.

<><><><><>

येमेनच्या हौदी बंडखोरांनी डागलेलं क्षेपणास्त्र इस्त्राएलच्या तेल अवीव इथल्या बेन गुरियन विमानतळाजवळ पडल्यामुळे ६ नागरिक जखमी झाल्याचं इस्त्राएलच्या अधिकाऱ्यांनी सांगितलं आहे. हल्ल्यानंतर बेन गुरियन विमानतळावर तात्पुरती थांबवलेली हवाई वाहतूक पुन्हा सुरु झाली असल्याचं इस्त्रायल विमानतळ प्राधिकरणानं म्हटलं आहे.

या हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर भारतातून तेल अवीव विमानतळावर जाणारी विमानसेवा एअर इंडिया ने येत्या ६ मे पर्यंत स्थगित केली आहे. तसंच टीयूएस एअरवेज आणि लुफ्थांसा ग्रुपसह काही विमानसेवा देखील रद्द केल्या आहेत.

**<><><><><>**

सातव्या ‘खेलो इंडिया युवा क्रीडा स्पर्धे’ला आजपासून बिहारमधे सुरुवात झाली. स्पर्धेत २८ क्रीडाप्रकारांमध्ये देशातले सुमारे साडेआठ हजार खेळाडू सहभागी होतील. यातल्या नेमबाजी, जिम्नॅस्टिक्स आणि ट्रॅक सायकलिंगच्या स्पर्धा नवी दिल्लीत होणार आहेत.

**//<><><><><>//**